# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 08 September – 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०८ सप्टेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग, सीबीआयनं आज लाचप्रकरणात मुंबईतल्या केंद्रीय वस्तू आणि सेवाकर कार्यालयाच्या काही अधिकाऱ्यांसह एका खाजगी व्यक्तीवर कारवाई केली आहे. केंद्रीय वस्तू आणि सेवा कर विभागातल्या एका प्रकरणात कारवाई न करण्यासाठी संबंधितांकडे या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी तब्बल साठ लाख रुपयांची लाच मागितली होती. कारवाई करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांत मुंबई पश्चिम आयुक्तालयातील एक अतिरिक्त आयुक्त, चार अधिक्षक दर्जाचे अधिकारी आणि एक सहआयुक्त तसंच सनदी लेखापालासह एका खासगी व्यक्तीचा समावेश आहे. या प्रकरणी सीबीआयनं नऊ ठिकाणी कारवाई करुन महत्वाची कागदपत्रंही हस्तगत केली आहेत.

****

राज्यात सध्या चिकनगुनिया आणि डेंग्यू या डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचे रुग्णांची संख्या वाढत आहे. हवामान बदलामुळे डासांची शक्ती आणि प्रजननक्षमता चारपट वाढली आहे, असं चेन्नईच्या आरोग्य सल्लागार डॉक्टर जयालक्ष्मी श्रीधर यांनी सांगितलं आहे. त्या नागपूर इथं आयोजित एका कार्यशाळेत बोलत होत्या.

हवामान बदलामुळे उष्णतेच्या लाटा, दुष्काळ, आणि अधिक पाऊस यांचे प्रमाण वाढलं आहे, भौगोलिक व्याप्ती वाढत असल्यानं डासांच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्याचं त्या म्हणाल्या. जागतिक तापमानवाढीमुळे हृदय, किडनी, आणि यकृताचे आजारही झपाट्यानं वाढत असून स्त्री–पुरुषांमध्ये व्यंध्यत्वाचा धोकाही वाढल्याचं डॉक्टर श्रीधर यांनी म्हटलं आहे.

****

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन आज साजरा केला जात आहे. प्रत्येक व्यक्ती, समुह आणि समाजामध्ये साक्षरतेचं महत्व अधोरेखीत  करणं हा या मागचा उद्देश आहे. बहुभाषिक शिक्षा संवर्धन, परस्पर समजदारी आणि शांततेसाठी साक्षरता अशी संकल्पना यंदाच्या वर्षी या दिनाच्या सादरीकरणासाठी निश्चित करण्यात आली आहे.

****

जैन धर्मियांच्या दहा दिवसीय पर्युषण महापर्वाला आजपासून प्रारंभ झाला आहे. येत्या १७ सप्टेंबरला या पर्वाची सांगता होईल. जैन धर्मियांसाठी या महापर्वात स्वत:चा अहंकार, लोभ, मतभेद, इर्षा यातून सुटका करुन स्वत:च्या शुद्धतेचा विचार मांडण्यात आला आहे.

यानिमित्त राज्यासह देशभरातील जैन मंदीरांमध्ये प्रार्थना-दर्शनासाठी भाविक दाखल होत आहेत. छत्रपती संभाजीनगर इथल्या विविध जैन मंदीरांमध्ये हे पर्व साजरं करण्यासाठी विशेष तयारी करण्यात आली आहे. गोंदीया इथल्या जैन मंदीरातही यानिमित्त जय्यत तयारी करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात गणेशोउत्सव काळात वाढतं प्रदुषण रोखण्यासाठी ध्वनीवर्धक प्रणाली अर्थात डीजेच्या वापरावर प्रतिबंध घालण्यात आला आहे. जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत. येत्या १९ सप्टेंबरपर्यंत हा प्रतिबंध लागू असणार आहे. सार्वजनिक शांतता- सुरक्षिततेस बाधा आणि आरोग्यासह मालमत्तेला हानी पोहचण्याची शक्यता असल्यानं ही बंदी घालण्यात आली आहे. दरम्यान, अकोला शहरातही ज्येष्ठ  नागरिक संघातर्फे जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्तांकडे डीजेवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

हवामान विभागाच्या सुधारीत अंदाजानुसार देशात मध्य महाराष्ट्रासह किनाऱ्यालगतच्या आंध्रप्रदेश –तेलंगाना आणि ओडिशात उद्यापर्यंत जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातल्या विदर्भ आणि कोकणसह गोवा, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, कर्नाटकची किनारपट्टी भाग, इशान्य प्रदेशातल्या काही भागात येत्या आठवड्यात मोठा पाऊस पडण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, नुकत्याच हाती आलेल्या वृत्तानुसार हिंगोली जिल्ह्यातलं ईसापूर धरण ९७ टक्के भरलं असून धरणातून पैनगंगा नदीत पाण्याचा विसर्ग केला जात आहे. तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथलं जायकवाडी धरणही जवळपास ९६ टक्क्यांपर्यंत भरल्यानं पाणी विसर्ग प्रस्तावित आहे.

****

तेलंगणात सध्या मुसळधार पावसामुळं खम्म्म आणि महबुबाबाद जिल्हे प्रभावित झाले असून अन्य दोन जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. परीसरातील नद्यांना पूर आल्यानं इथलं जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर, या राज्यात पुढच्या दोन दिवसांत वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

****

फ्रान्सच्या पॅरिस इथं आयोजित दिव्यांगांची जागतिक क्रिडा स्पर्धा – पॅरालिम्पिकमध्ये भारतानं घवघवीत यश मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. सात सुवर्ण, नऊ रौप्य आणि १३ कांस्य पदकांसह एकूण २९ पदकांची कमाई करत स्पर्धेत सोळावं स्थान पटकावलं आहे. या कामगिरीमुळं भारतीय खेळाडूंचं देशवासीयांकडून कौतुक केलं जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विजेत्यांचं अभिनंदन केलं आहे. मायदेशी परतलेल्या पदक विजेत्या खेळाडूंचं दिल्लीत केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांच्या हस्ते काल सत्कारही करण्यात आला आहे.

****